ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# आदिवासींच्या जमिन हक्कांसाठी साधनेचा लढा

**Ravindra Prabhakar Pradhan**
**Ph.D. student SP Pune University Pune.**



नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहीलेले संबधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी. "महाराष्ट्र राज्यातील आदिवासी तथा अनुसूचित जमातीच्या यादीत एकूण ४७ जमातींचा समावेश आहे. त्यापैकी १९ जमाती संख्याधिकयाने एक लाखापेक्षा अधिक जनसंख्येच्या आहेत.बाकी जमाती संख्येने अतिअल्प आहेत.तर काही जमाती गेल्या दोन तीन जनगणनेत आढळून आलेल्या नाहीत.[१]

महाराष्ट्र राज्यामध्ये वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातींमध्ये साधारणतः गोंड, माडीया, परधान, कोलाम, आंध, काथोडी,वारली, कोकणा,हलबा, कवर आणि इतर एकूण ४७ आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत. आदिवासींच्या वाटयाला त्यांच्या जीवनात दारिद्र्य, निरक्षरता, अज्ञान, अप्रगत शेती त्यातून मिळणारे अपुरे उत्पन्न आणि प्रगत समाजाकडून त्यांची होणारी फसवणूक सदैव त्यांच्या सोबतीला आहे. आदिवासींमधील व्यसनाधिनता त्यांच्या विकासात फार मोठा अडसर असून जमातीत मद्यपाना बरोबरच तंबाखु, गुटखा सारख्या नशायुकत पदार्थांचा लहान मुले, मुली, महीला व पुरुषांमध्ये सर्रास वापर होताना दिसतो. कुपोषणाचे प्रमाण हे आदिवासींमध्ये फार मोठया प्रमाणात आहे. जमातीत शिक्षणाचे प्रमाण नगण्य असल्याने अंधश्रध्देवर फार विश्वास आहे.नागर समाजाकडून दुर्लक्षित केलेला,सावकार, जमिनदार व व्यापारी वर्गाकडून पिळवणूक झालेल्या या वर्गाच्या कल्याणाकरीता अनेक व्यकती, संस्थानी कार्य करण्यास सुरवात केली होती.त्यांच्या कार्याची दखल घेऊन वेळप्रसंगी त्यांना आर्थिक, कायदेशीर मदत देण्याचे व्रत साधनाने अंगिकारले.

जंगलातील विकासप्रकल्प किंवा धरण म्हणजे आदिवासींचे जीवन उध्वस्त.त्यामुळे विस्थापित झालेल्या आदिवासींत नक्षली विचारसरणीचा प्रसार होतो. एकीकडे नक्षलवादयांची दहशत तर दुसरीकडे पोलीस, प्रशासनाची दडपशाही या दृष्टचक्रात आदिवासी अडकला आहे.आदिवासींवर हे दृष्टचक्र तर अनेक वर्ष चालू आहे. त्यामुळे जेव्हा कुठे आदिवासी एकत्र येऊन लढण्याचा वा अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी एकत्र येतात तेव्हा नक्षलवादयांची हालचाल म्हणून सरकारी अत्याचार सुरु होतो. साधनाने प्रत्येकवेळी सरकारच्या या धोरणावर टिका केली. गडचिरोली जिल्हा सरहद्दीवर भोपालपटनम् धरणामुळे अनेक माडीया गोंड आर्दिवासींचे पाडे पाण्याखाली जाणार होते. त्याच्या विरोधात कमलापूर येथे होणाऱ्या मेळाव्यावर बंदी घालून अनेक आदिवासींना तुरुंगात टाकले त्याचा निषेध साधनाने ८ माचे १९८४ च्या साधनेच्या अंकातील अग्रलेखात केला आहे."तोडला तरु फुटे आणखि भराने" या न्यायाने 'आदिवासींची दुर्दम्य आकांक्षा' नष्ट न होता फोफावेल. वनात राहणाऱ्या माडीया गोंडाला ते माहिती आहे. पण आंधळया आणि जुलमी शासनाला ते कळायला लागेल वेळ असे आजतरी दिसते."[२] असे साधना सांगते

"शासनाला माझा इशारा आहे, शस्त्रांनी या चळवळी दडपल्या जाणार नाहीत. बंदुकीच्या या गोळया हया दलितांच्या छाताडावर आपटून परत फिटतील व तुमचाच वेध घेतील हया असंतोषाची जाणीवपूर्वक दखल घ्या...." .[३]असा इशारा बाबा आमटे यांनी दिला होता

अन्यायाच्या प्रतिकाराची भावना पुष्कळदा परिस्थितीच्या दबावामुळे परिणीत होते.मग सूड घेण्याचे दृष्टचक्रच सुरु राहते. ते जोवर थांबत नाही तोपर्यंत अत्याचार, घातपात होत राहतात. शहादे परिसरात असे दृष्टचक्र सुरु होण्याची व शहादयाची 'चंबळ-घाटी' होण्याची शक्यता जे बोलून दाखवतात ती काही अगदीच निरर्थक नाही.त्या आधीच या संघर्षाला एक वळण दयायला हवे. चंबळघाटीत जे काम शांति-मिशनने केले.ते काम शहादे-तळोदे भागात कोण करणार?"[४] असा प्रश्न साधनाने वाचकांना विचारला.

आदिवासींच्या दारिद्र्याचे एक प्रमुख कारण म्हणजे त्यांच्याकडे नसलेली जमिन, त्यामुळे मजूरीशिवाय त्यांच्याकडे उत्पन्नाचा दुसरा मार्गच नाही.ज्या थोडयाफार जमिनी शिल्लक आहेत त्या आदिवासींच्या जमिनी जुलूम जबरदस्तीने धनदांडग्यांनी हस्तगत करायच्या, भूधारकाची जमिन काढून त्याला त्याच्याच जमिनीवर,शेतीवरमजुरीसाठी आपल्यावर अवलंबून ठेवायचे, मजूरी कमी देऊन लग्नाला अडीनडीला कर्ज दयायचे व त्याला वेठबिगार करुन पिढयानपिढया शोषण चालू ठेवायचे अशी ही परंपरा.आतापर्यंत आदिवासी वरिष्ठ वर्गीयांबरोबर गुण्या गोविंदाने राहात असत.आदिवासी निमूटपणे राबत रहात आणि उच्चभ्रू लोक हे निमूटपणे धन संचय करत राहात.उत्तराला प्रत्यूत्तर देणे हे तर त्यांना ठाऊकच नव्हते.आदिवासी पुरुष जसे या उच्चभ्रू लोकांचे गुलाम त्याच प्रमाणे त्यांच्या बायका या तथाकाथित प्रतिष्ठित लोकांच्या भोगदासी.ही फसवी शांती नव्या जागृतीच्या वातावरणाने नष्ट होऊ लागली.

'आदिवासी विधवेचे साकडे' या ॲड विजय साठे यांच्या [५] या लेखात आदिवासी महिला आकूबाई गायकर या स्त्रीचा संघर्ष सांगितला आहे. त्यांची मुरबाड तालुक्यातील वैशाखरे गावची जमीन गावातील देशमुखांनी जप्त केली. त्या विरोधात मुळ कागदपत्रे घेऊन तलाठी, सर्कल, कलेक्टर कडे जाऊनही दाद मिळत नसल्याची तक्रात आकूबाई करते व शेवटी दमून श्रमिक संघटनेकडे येते.अशी हकीकत दिली आहे. आदिवासींचे हे एक प्रातिनिधीक उदाहरण साधनाने दिले आहे. त्यावरुन गरीब आदिवासींना आपल्या मूलभूम हक्कांची जाणीव साधना करुन देते.

आदिवासींच्या जामिनी हिसकावून घेण्याचे अनेक प्रकार महाराष्ट्रात घडले. त्यातीलच एक प्रकार म्हणजे धर्माची, देवाची भीती दाखवून जामिन बळकावणे. याची नोंद विवेक पंडित यांनी घेऊन साधना मार्फत आदिवासींची हक्काची जमिन परत मिळवण्या करिता सामाजिक कार्यकर्त्यांना आवाहन केल्याचे दिसून येते. [६] विरार वज्रेश्वरी रोडवर मोक्याची जागा, बारक्या काकड या आदिवासीची. वंसत महाराज नावाच्या बाबाने धर्माची भीती घालून, गावकऱ्यांना सोबत घेऊन ती जमिन तीर्थश्रेत्र केली आणि बिचारा बारक्या काकड काहीच करु शकला नाही.

पेण तालुक्यामील करंबेळ या गावातील कोयना धरणग्रस्त आणि आदिवासी यांच्यातील दुर्देवी संघर्षाचे वर्णन 'मासा गिळतो माशाला' या लेखात अनिल अवचट यांना चितारला आहे. कोयना धरणासाठी सरकारने त्यांच्या जमिनी काढून घेतल्या आणि पेण तालुक्यामील करंबेळ या गावातील आदिवासींच्या वहिवाटीची जागा कोयना धरणग्रस्तांना दिली. सरकारीकायदयानुसार जमिनी सरकारच्या असल्या तरी शेकडो वर्षे आदिवासींच्या वहिवाटीची होती.धरणग्रस्त व आदिवासी दोघेही अन्यायग्रस्त. त्यांच्यात सरकारने संघर्षाचे बीजे रोवली आणि ज्या सरकारी धोरणांमुळे त्यांच्या वर अन्याय झाला त्याविरुध्द न लढता दोघेही आपणास संघर्ष करु लागले. हा देवदुर्देवीपणा अनिल अवचटांनी अत्यंत तरलपणे मांडला आहे. [७]

आदिवासींना कायदे माहित नसल्याने व शहरी संस्कृतींच्या विकासामुळे जमिनीला मोठी मागणी असल्याने आदिवासींच्या जमिनी ताब्यात घेण्याची त्यांनी त्यांच्या अनेक वर्षे वास्तव्य असलेल्या ठिकाणाहून हुसकावून लावण्याचा विरोधात साधनाने नेहमी महत्वाची भूमिका बजावली. 'मग्रूर पालिसांनी बेघर केलेल्यांचे पुर्नवसन होणार का?' हा रा.वि. भुस्कुटे यांचा लेख ठाणे शहरानजीक माजीवाडा येथील या आदिवासींची परिस्थिती विषद करतो. [८]

'सातपुडा जागा झाला!' बा.ना. राजहंस [९] धुळे जिल्हयातील शहादे, तळोदे, अक्कलकुवा परिसरातील आदिवासी भिल्लांची, त्यांच्या जमिनीच्या मालकी हक्कांसंबंधी, केलेल्या लढयाचे वर्णन आहे. सावकारांची जमिनी हडपण्याची पध्दत, सरकारी कार्यालयातील जमिनींच्या फेरफारांची नोंद, कुळकायदयाचा गैरवापर करत सावकार कुळे वरुन मालक कसे बनले, आदिवासींच्या जमिनी कशा कर्जासाठी, करारापोटी हडपल्या याचे वर्णन आढळते.आदिवासींची जमिनी हस्तांतर करताना कलेक्टरची परवानगी लागते.ती कशी मिळवली गेली याचे सादयंत वर्णन या लेखात आढळते.

'सातपुडा जागा झाला' या लेखमालेत बा.ना. राजहंस यांनी तोंडी कराराच्या माध्यमातून आदिवासींनी सावकाराकडून घेतलेले कर्ज आणि त्याबदल्यात सावकाराने घेतलेल्या जमिनी याचा काही हिशोबच नसल्याचे लिहिले आहे. हि आदिवासींची

फसवणूक होती, लूट होती."धुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेने सहा गावांची पाहणी केली.त्यात ३०० आदिवासींची २८३६ एकर जमिन करारापोटी व कर्जापोटी गेली असल्याचे दिसून आले आहे.हे करार बहुतेक तोंडी आहेत व आदिवासींनी नक्की किती जमिन दिली याचा पत्ता लागत नाही." [१०] असे ते या लेखात लिहीतात.

कुळकायदयामुळे जमिनी आदिवासींना मिळाल्या पण काही आदिवासींना दारिद्र्यामुळे हप्ते वेळेवर भरता आले नाहीत या सर्व कारणांनी जमिन पुनश्च भूमीहिन आदिवासींना देण्याऐवजी पुन्हा सधन सावकारांना देण्यात आली. सरकारकडे जमिनी परत जात होत्या. अशा प्रकारे जव्हार तालुक्यातील ३०० आदिवासी कुटूंबाना जमीन सरकारला परत करावी लागली.त्या विरोधात जव्हार तालुक्यातील तलावडे गावात २८ ऑक्टोबंर १९६८ मध्ये सत्याग्रह झाला. सरकारने चौकशी मान्य केली. तरी सरकारकडे परत आलेली जमीन पुन्हा आदिवासींनी काही मिळाली नाही. कायदा खरचं गरीब आदिवासींना मदत करतो का? असा प्रश्न साधनाच्या वाचकांच्या मनात निश्चितच निर्माण झाला असावा.

ज्या आदिवासींच्या साधनसंपत्तीवर असे प्रकल्प उभारले जात आहेत, त्यांच्यावर त्या आदिवासींचा मालक म्हणून अधिकार का नाही, फक्त मजूरांची भूमिका त्यांच्या नशिबी का? साधनाने आपल्या अंकात नेहमी स्पष्ट म्हटले आहे की विकासाच्या धबडग्यात आदिवासींना मजूरांची भूमिका नको आहे. आदिवासींच्याजमिनीवर जे उदयोग उभारले जातील त्यात ५१% भागीदारी स्थानिक लोकांची, २५%भागीदारी सर्व तऱ्हेच्या मजूरांची व २५% भांडवल गुंतवणाऱ्यांची. यापुढे लोकांना विस्थापित करण्यापूर्वी आधीच्या विस्थापितांची सन्मानपूर्वक जगण्याची व्यवस्था करावी.

आदिवासींच्या अज्ञानाच्या फायदा सावकार लोक पुरेपूर उठवून त्यांना आयुष्यात कधीच डोके वर काढून देत नाहीत. हया बाबतीत सरकारी यंत्रणेची कामाच्या बाबतीतली दिरंगाई, बेजबाबदारपणा, उडवाउडवीची वागणूक, आदिवासींकडे किंवा ज्यांच्याकडे पैसा, सामर्थ्य नाही अशांकडे लक्ष न देण्याची वृत्ती, आदिवासींचे संपूर्ण जीवन बरबाद करण्यास मदत करते. साधनाने वेळोवळी या गोष्टी आपल्या पत्रकातून उघड केल्या. आदिवासींची परिस्थिती सुधारण्यासाठी कोणतेही एक गोष्ट करुन भागणार नाही.त्यांच्या सर्वकष विकास करण्यासाठी त्याच्या सर्वकष समस्या आपण जाणून घेतल्यापाहिजेत. अज्ञान, रुढीग्रस्तता, अंधश्रध्दा यांचे आदिवासींवरील जोखड, दारुसारख्या व्यसनांचा विळखा, सावकारांच्या मायावीपणाची भुरळ, नोकरशाहीचा कावेबाज विळखा या सर्व समस्यामधून आदिवासींची सुटका झाली पाहिजे याची तळमळ साधनाला होती. त्यासाठी नवे विचार, नवे तंत्र, आत्मविश्वास, आदिवासींमध्ये निर्माण व्हावा, आदिवासी मधूनच कार्यकर्ते निर्माण व्हावे अशी तळमळ साधनाला होती. त्यातूनच लेखांमागून लेख लिहून जनजागृती, प्रसंगी आर्थिक मदत कायदेशीर सल्ला देण्यास साधना मागेपुढे पाहत नसे.

## टीपा आणि संदर्भ ग्रंथ

१. गारे गोविंद, *महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित* , आदिवासी, जमाती, पृ. ३९
२. *साधना साप्ताहिक* , ८ माचे १९८४ पृ ५.
३. *साधना साप्ताहिक*, १८ मे १९७४ पृ. ८.
४. *साधना साप्ताहिक*, १८ मे १९७४ पृ. ९.
५. *साधना साप्ताहिक*, १८ जून १९८७ पृ. १०.
६. *साधना साप्ताहिक*, ३० ऑगस्ट १९८२ पृ.९
७. *साधना साप्ताहिक*, ३ जून १९७२ पृ. ४-५
८. *साधना साप्ताहिक*, ३ मे १९९७ पृ १५.
९. *साधना साप्ताहिक*, १ जुलै १९७२ पृ.५.
१०. *साधना साप्ताहिक*, १५ जुलै १९७२ पृ.१९.
११. गारे गोविंद, *भारतीय आदिवासी समाज व संस्कृती*, आदिम प्रकाशन, पुणे,१९७५.
१२. खडसे भा. की., *आदिवासी समाजाचे समाजशास्त्र*, हिमालया प्रकाशन, मुंबई,२०१२.
१३. नाडगोंडे गुरुनाथ, *भारतीय आदीवासी*, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे,१९७९.
१४. फडके सुधीर, *महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न,* जोशी आणि लोखंडेप्रकाशन, पुणे,१९६३.